# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०५/२०१८

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरी जावुन प्रवेश करुन तुझा नवरा कुठे आहे? असे म्हणुन धाणाच्या पैश्याचे कारणावरुन फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करीत असता फिर्यादीने त्यांना शिवीगाळ करु नका, तुमचे पैसे २५ तारखेपर्यंत देतील असे बोलली असता आरोपी क्र. २ ने फिर्यादीने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन डोक्याचे केस पकडून लाथाबुक्यांने मारपीट केले व आरोपी क्र. १,३ व ४ यांनी सुध्दा शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५२,२९४,५०६,३२३,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे ०४.०० ते ०४.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रक क्र. एपी ०९/एचजी ३९६२ चा चालक व ट्रक क्र. सिजी ०४/ एच आर ४०८१ च्या चालाकाने आपआपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन हयगयीने व लापरवाहीने चालवुन रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन रस्त्याचे बाजुला जागा असुन सुध्दा रस्त्याचे मधोमध दोन्ही ट्रक चालकांनी एकमेकांस ड्रायव्हरच्या बाजुने सेंट पिटर शाळे समोर एनएच ०६ रोड बेला येथे धडक देवुन अपघात घडवुन ट्रक क्र.एपी ०९/एचजी ३९६२ चालकांचे हयगयीने मृत्युस कारणीभुत होवुन तसेच ट्रक क्र. सिजी ०४/ एच आर ४०८१ चे चालक वसंता धोडोबाजी गायकी वय ४५ वर्ष, रा. शिवशक्ती नगर नागपुर यांला गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. दुधकवरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीवर जबरीने अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे ११.४५ ते १५.०० यातील अल्पवयीन फिर्यादी ही तुमसर वरुन टयुशन आटोपुन गावी मोखेटोला जाणेकरीता एसटी बस मधुन उतरली असता यातील आरोपी क्र. २ यांनी मोटार सायकलने पाठलाग करुन फिर्यादीला अडवुन जबरीने मोटार सायकलवर बसुन मेंहगाव रोड येथे एका रुम मध्ये घेवुन गेले व आरोपी क्र. २ हा रुम बाहेर थांबला व आरोपी क्र. १ ने फिर्यादीने जबरीने अत्याचार केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७६(ड),३४१,३६६(अ) भादवी. सहकलम ४,१२ बा. लै.अ. प्र. कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) जनावरांना कोंबुन कागदपत्रे सोबत न बाळगता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे १०.१० ते ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी वाहन चालवण्याचा परवाना व वाहनाचे मुळ कागदपत्रे सोबत न बाळगता त्याचे ताब्यातील पिकअप डाल्यात ३ मोठे बैल, २ वाहन गोरी, व ५ लहान गोरे असे एकुण १० जनावरे किंमती १,०५,०००/—रु. चे जनावरे यांना यातना व वेदना होतील त्यांना वाहनाचे डाल्याचे साईड पल्ल्याशी दोराने बांधल्याने त्यांना कोणतीही हालचाल करता येणार नाही अशा रितीने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ११(१)(घ)(ड)(च)प्रा.क्रु.वा.प्र. का १९६० सहकलम ८३ एमएमव्हीआर/ १७७,१३०/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) हयगयीने ज्वालाग्रहीत गॅस बेकायदेशीर रित्या स्वत:चे व इतरांचे जिवीतस धोका निर्माण होईल स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे १२.०० ते १३.४५ यातील आरोपीतांनी संगनमत करुन शासकीय अनुदानीत घरगुती वापराचे गॅस सिलेंडर बेकायदेशीर रित्या चारचाकी वाहनामध्ये गॅस ट्रॉन्सपर मशिनव्दारे हयगयीने ज्वालाग्रहीत गॅस मुळे स्वत:चे व इतरांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीमध्ये भरतांनी मिळुन आल्याने त्याचेपासुन १ ट्रान्सपर मशिन किंमती अंदाजे ५,०००/—रु. एचपी भारत गॅस, कंपनीचे ७ सिलेंडर किंमती ५,२५०/—रु. १ मारोती ओमनी कार क्र. एमच ३१ सीएस २८६१ किंमती अंदाजे १,५०,००/—रु. असा एकुण १,६०,२५० चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मडामे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधि. १९५५ सहकलम २८५,३३६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.